नियमीत फौजदारी खटला क्र. **१२५/२०१७**
निशाणी क्र. **७५/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०५** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **वैभव दिपक सायगांवकर** |
| वय सुमारे | : | ४३ वर्षे, व्यवसाय : पोलीस हवालदार |
| सध्या नेमणूक | : | सोशल मिडीया लॅब, अलिबाग |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. प्रसाद पाटील यांचेमार्फत</u>:**

०१. दि. १२/०९/२०१६ रोजी मी अलिबाग पोलीस ठाणे येथे पोलीस नाईक, ब.क्र. ११९७ या पदावर कार्यरत होतो. गुन्हा रजि. क्र. १२१/२०१९, भारतीय दंड विधान कलम ४९८–अ सह कलम ३४ चा तपास वरिष्ठांच्या आदेशाने माझ्याकडे देण्यात आला. तपासकाम माझ्याकडे आल्यानंतर सर्वप्रथम मी लग्नपत्रिका व विवाहाचा दाखला प्राप्त केला. फिर्यादीचे आईवडील व भावाकडे तपास करुन त्यांचे तपास टिपण नोंदवले. त्यांचे वाद मिटवण्यासाठी सुरक्षा शहा व ॲड. पल्लवी तुळपुळे यांनी मध्यस्थी केली होती. त्यांच्याकडे तपास करुन त्यांचे तपास टिपण नोंदवले. त्यादरम्यान आरोपींना अटकपूर्व जामीन मंजूर झाला होता. त्यामुळे आरोपींना तपासकामी बोलावून त्यांचे जबाब नोंदवले. माझ्या तपासात आरोपींविरुद्ध सबळ पुरावा मिळून आल्याने मी त्यांच्याविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. आरोपींना पाहिल्यास मी ओळखू शकेन. आज आरोपी क्र. २ न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपींकरीता वकील श्री. प्रविण ठाकूर यांचेमार्फत</u>** :

०२. हे म्हणणे खरे आहे की, विराग मेहता व फिर्यादीचा प्रेमविवाह झाला

होता व ते एकाच इमारतीमध्ये राहात होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींचे बाजारपेठेत किराणामालाचे दुकान आहे. हे म्हणणे खरे आहे की, विराग मुंबई येथे कामाला होता. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीचे आईवडील व आरोपींचे घर एकाच इमारतीत होते. हे मला माहीत नाही की, दि. १८/०६/२०१६ रोजी फिर्यादी गोंधळपाडा येथे राहण्यास गेली. हे म्हणणे खरे आहे की, फिर्याद दि. १२/०९/२०१६ रोजी दाखल करण्यात आली आहे. मी 'शिवराम नंदा' या इमारतीतील लोकांचे जबाब घेतलेले नाहीत.

०३. पल्लवी तुळपुळे ह्या अलिबागमधील वकील व सुरक्षा शहा ह्या अलिबाग मधील सामाजिक कार्यकर्त्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, त्या दोघी फिर्यादी व आरोपींमध्ये समझोता करण्यासाठी गेल्या होत्या.

०४. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने खोटी तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, तिच्या आईवडीलांनी खोटी साक्ष दिली आहे. हे मला माहिती नाही की, फिर्यादीच्या वडीलांनी आरोपी क्र. १ ला मारहाण केली होती. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी स्वतःच्या इच्छेने माहेरी निघून गेली. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीच्या वडीलांचा फिर्यादीच्या संसारात हस्पक्षेप होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी फिर्यादीकडे कधीही हुंडा मागितला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी कधीही फिर्यादीने जमीनीतील हिस्सा मागावा याबाबत छळ केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने कुठलाही त्रास नसताना खोटे अर्ज पोलीसांकडे दिलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने पैसे देण्यास नकार दिला म्हणून आरोपींनी तिला त्रास दिला हे म्हणणे खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने मोघम स्वरुपाची फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना तुरुंगात टाकण्याकरीता फिर्यादीने खोटी फिर्याद दिली.

०५. फिर्यादीच्या वडीलांची मिळकत असल्याबाबत कागदोपत्री पुरावा मी हस्तगत केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीला फिर्यादीच्या वडीलांनी पैसे दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी चुकीचा तपास केला. हे म्हणणे खरे नाही की, मी चुकीचे दोषारोपपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **०८/०५/२०२६**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.